गायत्री दिपक रोडे

# एक होती राजकन्या



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

कथासंग्रह

# एक होती राजकन्या

लेखिका : गायत्री दिपक रोडे

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# एक होती राजकन्या

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# एक होती राजकन्या

## लेखिका : गायत्री दिपक रोडे

आंबेगाव पठार, पुणे, महाराष्ट्र – ४११०४६

फोन नं : ९८३४९७१३१२

e-mail - gayatrirode951@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १० मे २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

एक होती राजकन्या

गायत्री दिपक रोडे

मनोगत

नमस्कार वाचक मित्रांनो,

मी गायत्री दिपक रोडे. मी आत्ता बी.सी.एस.च्या द्वितीय वर्षात शिकत आहे. राहायला मी पुण्याला आहे. मला वाचनाची आणि लिखानाची खूप आवड आहे. माझ्या लेखनाची सुरुवाच ही ई-साहित्यमुळेच झाली. आधी मी थोडं फार लिहायचे पण मी कथा ही लिहू शकते हे मला ई-साहित्यमुळेच कळले. लहानपणापासूनच मला वाचनाची गोडी आहे. दिवसाला २-३ छोटी गोष्टींची पुस्तके मी वाचून काढायचे. इंग्लिश बूक्स सहज मिळतात म्हणून माझं वाचन तेवढंच होतं. फक्त इंग्रजी लेखकच वाचले होते. विंग्ज ऑफ फायर, थिंक अँन्ड ग्रो रिच, रिच डॅड पूअर डॅड, इ ही माझी काही आवडती पुस्तकं.

मागच्या वर्षी लॉकडाऊन पडल्याने वेळच वेळ होता. यामुळे वाचनाचे जे बीज लहानपणी लावले होते त्याला ह्यामुळे खत-पाणी मिळत गेले. मराठी पुस्तकं नेटवर शोधायची मोहीम सुरु झाली. अनेक वेबसाईट पालथ्या घातल्यावर ई-साहित्य सापडले. काहीच दिवसांत मी ई-साहित्य वरची १०० हून अधिक पुस्तकं वाचली. एवढी दर्जेदार पुस्तके वाचल्यामुळे माझा मराठी वाचनातला रस आणखी वाढला. मराठी लेखक मी एवढे वाचले जरी नसले तरी

ई-साहित्यवरचे काही लेखक मनात अगदी घर करुन गेले. त्यांच्या कथेतील पात्रं कधीच विसरता न येणारी आहेत. स्वीटी महाले, प्राजक्ता देशपांडे, शुभांगी पासेबंद, सूरज गाताडे, प्रफुल शेजव, सौरभ वागळे, इ. यांची पुस्तके खूप भारी आहेत. खूप उत्कृष्ट असं त्यांचं लेखन आहे.

हे माझं पहिलंच पुस्तक आहे. मनात खूप काही दाटून आलंय. आनंद तर नक्कीच आहे की मी माझं पहिलं पुस्तक लिहून प्रकाशित करणार आहे. या सोबतच थोडी भीती पण आहे की वाचकांना माझा हा प्रयत्न आवडेल की नाही. मला नेहमी वाटतं की माझ्या लेखनाच्या माध्यमातून लोकांपर्यंत विषय पोहोचावेत. काही क्षण का होईना त्यांनी कथेचा विचार करावा. एवढं जरी साध्य झालं तरी पुस्तक लिहीणं सार्थकी ठरेल.

या कथासंग्रहाबाबत सांगायचे झाले तर पहिली कथा ही एका राजकन्येची आहे जी अशक्य गोष्टीही शक्य होऊ शकतात हे मानते. दुसरी कथा ही एका विद्यार्थ्याची आहे.

आपल्याला जरी ह्या गोष्टी छोट्या वाटत असल्या तरी इतरांसाठी त्या मोठ्या असू शकतात. कथेबद्दल तुम्हाला काय वाटतं हे कळवायला विसरु नका. तुमच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यात मला खूप आनंद होईल. तुम्ही तुमच्या प्रतिक्रिया मला ई-मेलवर

gayatrirode951@gmail.com वर कळवू शकता किंवा मला instagram gayatrirode27 वर कळवू शकता. ईंपूट १०० टक्के दिलाय त्याचा आऊटपूट तुम्हीच ठरवा आणि कळवा. तुमचे आशीर्वाद नेहमी पाठीशी असू दे

चला तर मग ह्या पहिल्या-वहिल्या वाचन प्रवासाला सुरुवात करु या.

गायत्री रोडे

संपर्क पत्ता : आंबेगाव पठार, पुणे, महाराष्ट्र – ४११०४६

फोन नं : ९८३४९७१३१२

अर्पणपत्रिका

सावलीप्रमाणे नेहमी माझ्यासोबत असणाऱ्या आणि मला प्रोत्साहन देणाऱ्या मम्मी-पप्पा आणि लहान भावास समर्पित. त्याचसोबत माझ्या पूर्ण परिवारांस आणि मित्र मंडळीस समर्पित.

कथानुक्रम


- एक होती राजकन्या
- स्कॉलर

# एक होती राजकन्या

कामाक्षीपुरम नावाचं एक सुंदर राज्य होतं. या राज्यात सुख-समृध्दी नांदत होती. ह्या राज्यात एक दाट जंगल होतं, ज्यातले वन्य प्राणी, वनस्पती, झाडं, पक्षी हे प्रजेने जपले होते. पूर्ण राज्याला पाणी पुरवणारी कामाक्षी नदी होती. प्रजा सख्याने रहायची. कधी कोणास गरज लागली तर मदतीस धावून जाई. अडल्या-नडल्यास मदत करी. प्रजा सुखी होती. राजा चक्रधर प्रजेच्या सगळया गरजा पूर्ण करी. कधीही कोणत्या गोष्टीची कमी पडू देत नसत. कामाक्षीपुरमचे इतर राज्यांसोबत चांगले संबंध होते. हे राज्य खूप शक्तीशाली होतं जेव्हा पण शत्रू राज्यावर हल्ला करीत तेव्हा त्यांचा पराभव निश्चित होता. कामाक्षीपुरम अपराजित होतं. अजेय होतं.

चक्रधर राजाचं म्हणणं होतं की सर्वांना समान अधिकार असावेत. त्यांचा न्याय व्यवस्थेवर विश्वास होता. त्यांना एक मुलगी होती चित्रा, नावाप्रमाणेच दिसायलाही तेजस्वी. राजकन्या अनेक कलांमध्ये पारंगत होती. ती युद्ध कलेतही निपुण होती. ती वडीलांना राज्य कारभारातही मदतही करायची. कधीच कोणावर अन्याय होणार नाही याची काळजी घ्यायची. राजा चक्रधरही तिला

प्रत्येक निर्णयात तिचं मत विचारत. तिला राज्यात फिरण्यास मनाई नव्हती. कोणाच्याही घरी जाणे, त्यांच्यासोबत जेवणे, मुलांसोबत खेळणे राजकन्येला खूप आवडत. त्यामुळे प्रजेचे तिच्यावर खूप प्रेम होते ह्याच वागण्याने तिच्या ३ खूप खास मैत्रिणी होत्या – राधा, आनंदी आणि श्रावणी. राधा ही राजकन्येप्रमाणेच हुशार आणि धाडसी होती. तर आनंदी त्या उलट. श्रावणी मात्र खूपच गोड आणि थोडीशी वेंधळी होती. त्या तिघी नेहमी राजकन्येसोबत असत.

एक दिवस राज्यात अन्य राज्यांचे महाराज आले. त्यांच्या येण्याबाबत दरबारात चक्रधर राजाला कळवण्यात आले.

“महाराज कृपया आम्हाला मदत करा.” पंचम राज्याचे महाराज राघवेन्द्र बोलले.

“आम्ही नक्कीच तुम्हाला मदत करु. तुमचे इथे येण्याचे प्रयोजन?” चक्रधर महाराजांनी विचारले.

“महाराज आमच्या राज्यात एका मायावी राक्षसाने हल्ला केला. त्याने पूर्ण प्रजेला हैराण केलंय. दरवेळी तो येऊन राज्य उध्वस्त करतो. सगळीकडे नुसता हाहाकार माजलाय. प्रजेची पिकं पण खराब केली आहेत त्याने. प्रजा खूप घाबरली आहे महाराज.” महाराज राघवेन्द्र म्हणाले.

“महाराज आमच्याही राज्यात खूप नूकसान केलंय. त्याला ज्या वस्तू आवडतील तो त्या घेऊन जातो. सगळी घरं उध्वस्त केली आहेत.” लिंगराज – लिंगाणा राज्याचे महाराज बोलले.

“मग तुम्ही त्याच्यावर हल्ला का केला नाहीत?” दरबारातील एका मंत्र्याने विचारले.

“आम्ही हल्ला केला होता सैन्यासोबत पण काही फायदा झाला नाही. उलट त्याने आमच्या सेनापतींना कैद केले. सेनेचाही काही पत्ता लागला नाही. त्यांना मुक्त करायला जाणारा कधीच परत आला नाही. त्या व्यक्तीचं पुढे काय होतं ते कोणालाच माहीत नाही.” लिंगराज बोलला.

“तो जिथे जाईल तिथे तो त्याच्या जादूने महाल तयार करी आणि त्यातच राहत असे. त्याचा महालही खूप भव्य आणि अवाढव्य महाल आहे. तो महाल सोन्याचा आहे. दुरुनही तो दिसतो. राक्षस जास्त काळ एका ठिकाणी वास्तव्य करीत नसे. लोकांना दुःखात बघून त्याला फार आनंद होतो.” महाराज राघवेन्द्र म्हणाले.

“राक्षस जेव्हा- जेव्हा हल्ला करतो तेव्हा दरवेळी त्याच्यासोबत त्याचा एक सेवक असतो. तो नेहमी काहीतरी

वेड्यासारखा बडबडत असतो. काय होतं ते?" आठवण्याचा प्रयत्न करत लिंगराज बोलले.

"हा आठवले उजवे तीन डावे तीन उजवा एक. सतत तो हेच बडबडत असतो. ह्याचा अर्थ कधीच कळला नाही आम्हांस."

"आम्ही कशी आपली मदत करु शकतो यात?" चक्रधर महाराजांनी विचारले.

"आम्ही सगळ्यांनी खूप प्रयत्न केले आमचे राज्य वाचवण्यासाठी पण यशस्वी होऊ शकलो नाहीत. चक्रधर महाराज आपले राज्य अपराजित आहे म्हणून आम्ही तुमच्याजवळ मदत मादायला आलोत. कृपया आम्हाला मदत करा." महाराज राघवेन्द्रांनी विनंती केली.

"आम्ही नक्कीच आपल्याला साहाय्य करु. त्या मायावी राक्षसावर हल्ला करु आणि त्याच्या दहशतीतून तुमची आणि इतर राज्यांची सुटका करु. राक्षसाच्या कैदेतील लोकांना मुक्त करण्याचं आम्ही तुम्हाला वचन देतो. पण आम्हाला तो राक्षस कुठे सापडेल?" चक्रधर महाराजांनी विचारले.

"महाराज तो आमच्या राज्यात आहे. तो तुम्हाला अडवण्याचा नक्की प्रयत्न करणार त्यामुळे जरा सांभाळून जा." लिंगराजाने सांगितले.

“हो जरुर. तुम्ही निश्चिंत रहा.” चक्रधर महाराजांनी आश्वासन दिले.

“आम्ही आपले ऋणी आहोत!” महाराज राघवेन्द्रांनी आभार मानले.

दरबारातील चर्चा-

“सेनापती आपण उद्याच त्या मायावी राक्षसावर हल्ला करुयात. तुम्ही हल्ला करण्याची तयारी करा.” महाराज चक्रधरांनी सूचना केली.

“जशी आपली आज्ञा महाराज.” सेनापती म्हणाले.

सेनापतींनी हल्ल्याची तयारी सुरू केली. पुढच्या दिवशी चक्रधराने आणि त्याच्या सैन्याने सकाळीच जायचं ठरवलं. राक्षसाला मारण्यासाठी ते लिंगाणा राज्यात पोहोचले. पूर्ण ताकतीनिशी त्यांनी हल्ला केला पण राक्षसाने त्यांना पराजित केले. अनेक सैनिक जखमी झाले तर काही धारातिर्थी पडले. राक्षसाने चक्रधराला कैद करुन घेतले. महाराज राघवेन्द्रांनी जखमी सैनिकांवर औषधापचार केले आणि तातडीने कामाक्षीपुरमला

राजाच्या कैदेचा संदेश पाठवला. ही वार्ता पूर्ण राज्यात वनव्यासारखी पसरली.

आज पुन्हा दरबारात सभा भरली. पूर्ण राज्य कारभार महाराज येईपर्यंत महाराणी सांभाळणार होत्या. या सभेत महाराजांना कसे सोडवायचे याबाबत चर्चा चालू होती.

“महाराणी आपल्याला लवकरात लवकर महाराजांना सोडवायला हवे. प्रजा खूप गोंधळली आहे.” प्रधानजींनी सांगितले.

“हल्ला कसा करायचा तेच काही कळत नाहीये. या हल्ल्यात आपले सेनापती धारातिर्थी पडले आहेत. त्यांच्याशिवाय आपण कसा हल्ला करणार?” एका मंत्र्याने चिंता व्यक्त केली.

“प्रधानजी आपण सेनापतींच्या घरच्यांना मोहरा दिल्यात का? त्यांच्या परिवाराची पूर्ण जवाबदारी आता आपल्यालाच घ्यायला हवी. हल्ल्याचं म्हणत असाल तर आपले खूप सैनिक जखमी आहेत आणि कमी सैन्य बळावर आपण हल्ला नाही करु शकत. कोणाकडे काही मार्ग असल्यास सांगा?”

“मातोश्री आम्ही काही सुचवू?” चित्राने विचारले.

“हो जरुर.” महाराणी म्हणाल्या.

“मातोश्री आम्ही जातो पिताश्रींना सोडवायला. कृपया आम्हाला परवानगी द्या. चित्रा

“नाही. आम्ही तुम्हाला परवानगी नाही देऊ शकत.” महाराणी

“पण मातोश्री आम्हाला काही होणार नाही. तुम्ही नका काळजी करु.” चित्रा

“नाही, आम्ही तुमचा जीव धोक्यात नाही टाकू शकत.” महाराणी

“महाराणी त्या एकट्या नसतील मी जाईन त्यांच्यासोबत.” श्रावणी

“आम्ही दोघी पण जाऊ त्यांच्यासोबत. काय गं राधा?” आनंदी

“हो. तुम्ही निश्चिंत रहा महाराणी. राजकन्येला काहीही होणार नाही.” राधा

“पण...” महाराणी

“पण वगैरे काही नाही. आम्ही तुमचं काही ऐकणार नाही. आम्ही पिताश्रींना सोडवायला जाणार.” चित्रा

राजकन्येचा निर्धार पक्का होता. त्या कोणाचंच ऐकायला तयार नव्हत्या. त्यांच्या मैत्रिणींनाही त्या सोबत घेऊन जायला तयार नव्हत्या.

"आम्ही येणार तुमच्या सोबत. तुम्हाला एकटीला जाऊ देणार नाही." आनंदी

"आम्ही तुमचा जीव धोक्यात टाकू शकत नाही." चित्रा

"आम्हाला सोबत येऊ द्या चित्रा. तुम्हाला आपल्या मैत्रीची शपथ आहे." राधा

"ठिक आहे. आम्ही काय बोलणार आपण उद्याच जाऊ." चित्रा

चित्राने पूर्ण तयारी केली. तिची तलवार म्यानात सज्ज होती हल्ला करण्यासाठी. तिच्या इतर मैत्रिणीही तयार होत्या. त्यांनी ठरवलच होतं आज काहीही करुन त्या राक्षसावर हल्ला करुन त्याचा वध करुन त्याच्या तावडीतील लोकांन सोडवायचं.

दुसरा दिवस उजाडताच ते राक्षसावर मात मिळवण्यास निघाले. लिंगाणा राज्यात त्या राक्षसाने आपले बस्तान मांडले होते. लिंगाणा राज्य कामाक्षीपुरम जवळच होते. जंगल आणि कामाक्षी

नदी ओलांडताच लिंगाणा राज्याची सीमा होती. लिंगराजाने सांगितल्याप्रमाणे तो राक्षस त्यांच्या सीमेजवळच होता त्यामुळे त्याला जास्त शोधावे लागणार नव्हते. चित्रा आणि तिच्या मैत्रिणी या खडतर प्रवासासाठी सज्ज झाल्या. सकाळीच आपल्या घरच्यांचा आशीर्वाद घेऊन त्या निघाल्या. त्यांना सगळयात आधी जंगल पार करायचे होते. लिंगराजाने त्यांना सावध राहण्यास सांगितले होते. राक्षस आपल्याला सहज येऊ देणार नव्हता हे त्यांना माहीत होते.

जंगलात प्रवेश करताच सगळे वातावरण बदलू लागले. अचानक काळे ढग येऊ लागले.

“हे अचानक काय होतंय? आत्ता तर आभाळ किती साफ होतं एवढे ढग कसे आले?” आनंदी

“मला तर काहीच दिसत नाहीये समोरचं.” श्रावणी

“पण आता काय करायचं? पुढे कसं जायचं?” चित्रा

“एक मिनिट थांबा मी कंदील आणलाय. मी पेटवते तो.” राधा

“वा बरं झालं तु कंदील आणलास. लवकर पेटव.” श्रावणी

“कधी काय उपयोगी येईल हे सांगता नाही येत. आपल्याला किती वेळ लागेल

हे माहीत नव्हतं म्हणून मी कंदील आणला. मला थोडी मदत कर ना.''राधा

"हा दे माझ्याकडे. मी मदत करते तुला." चित्रा

"झालं चला आता जाऊ पुढे." आनंदी

काही अंतर चालल्यावर वातावरण पूर्वी सारखं झालं.

"अरे हे काय घडतय? सगळे ढग गेले. हे कसं काय शक्य आहे?" आनंदी

"सगळं शक्य आहे. आपण त्या राक्षसापर्यंत पोहोचू नये म्हणून हे सगळं घडत आहे. आपण चालत राहूया." चित्रा

त्यांच्यासमोर अचानक सैनिक तयार झाले आणि त्यांच्यावर हल्ला करु लागले.

"आता हे कुठून आले? आणि हे काय एकाला मारलं तर दोन तयार होत आहेत. अशाने ही लढाई कधीच संपणार नाही आणि आपला टिकाव पण लागणार नाही ह्यांच्यासमोर." श्रावणी

"काहीतरी मार्ग नक्कीच असेल ह्यांना संपवायचा. तोवर हार मानू नका." चित्रा

चित्रावर हल्ला करायला एक सैनिक येत असताना तिचा पाय दगडात अडकून ती खाली पडते. तिच्या जवळची तलवारही लांब

पडते. आता काय करणार या गोंधळात ती माती त्याच्या डोळ्यांत फेकते. सैनिक गायब होतो आणि दुसरा सैनिकही तयार होत नाही. यावरुन तिला कळतं की माती फेकताच सैनिक गायब होतात.

“मार्ग सापडला. यांच्यावर शस्त्राने प्रहार करु नका. ह्यांच्या डोळ्यांत माती फेका. ते गायब होतील.” चित्रा

“काय? माती फेकू ज्यांच्यावर तलवारीचा काही प्रभाव होत नाही त्यांच्या डोळ्यांत माती फेकल्याने काय होईल?” राधा

“एकदा फेकून तर बघ.” चित्रा

“हे ही करुन बघू.” श्रावणी. तिने लगेच करुन पण बघितले.

तिला बघून राधा आणि आनंदीने ही माती उचलून फेकली. काही क्षणातच सगळं सैन्य गायब झाले. सगळ्यांनाच खूप आनंद झाला. जंगल पार करुन त्या बाहेर पडल्या. आता त्यांना नदी ओलांडून पलीकडे जायचे होते.

“अरे इथे तर एक पूल होता ना? कुठे गेला तो?” आनंदी

“कुठे दुसरीकडे असेल. नीट आठव.” चित्रा

“नाही. तो पूल इथेच होता. मला चांगलं आठवतंय. मी बाबांबरोबर जायचे त्या पूलावरुन नेहमी. इथेच हवा होता पूल.” आनंदी विचार करत बोलली.

“इथेच होता मला पण खात्री आहे. एक काम करु थोडं पुढे जाऊन बघूया. कदाचित पुढे असेल.” श्रावणी असं बोलत चालायला ही लागली. तिच्या पाठोपाठ सगळ्या

चालू लागल्या.

“अजून किती चालायचय श्रावणी? नाहीये इथे कोणताच पूल.” चित्रा

“चालून-चालून खूप तहान लागलीये आणि खूप दमलीये मी. आपण इथेच थोडा वेळ थांबू. जरा आराम पण करता येईल आणि पाणी पिता येईल.” असं बोलून राधा पाणी पिण्यासाठी खाली वाकली आण् दचकूनच मागे सरकली.

“काय गं राधा काय झालं अशी दचकलीस का? भूत बघितलं की काय?” श्रावणी थट्टा करत म्हणाली.

“अगं भूत नसेल तिने पाण्यात स्वतःचा चेहरा बघितला असेल.” चित्रा

“तू ही दचकशील ते बघून.” असं बोलून राधाने नदीकडे बोट दाखवलं.

“हे काय मगरी? ते पण आपल्या नदीत कधीपासून?” आनंदी

“आजपासूनच, आपण त्या राक्षसाला मारायला चाललोय. तो काहीही करु शकतो आपल्याला अडवण्यासाठी. आधी तो

सैनिक आता हे. पूल पण त्यानेच गायब केला असणार. आता नदी कशी ओलांडायची?" आनंदी

"लिंगराजाने सांगितले होते जस-जसं आपण त्याच्या जवळ पोहोचू तसे तो अधिक अडथळे निर्माण करणार आपल्या मार्गात." चित्रा

"तुम्ही नीट पाहीलत का यातील काही मगरींची तोंडं बंद आहेत तर काहींची उघडी. पोहून जाऊच शकत नाही आपण पण ह्यांच्यावरुन उड्या मारुन नक्कीच जाऊ शकतो." राधा

"उड्या मारुन मग थेट यमसदनी प्रस्थान करु. हा वेडेपणा आहे. मी नाही उडी मारणार." आनंदी

"थांब जरा आपण बघू काय होतंय ते." चित्राने असं बोलताच जवळची एक काठी उचलली आणि ज्या मगरीचं तोंड बंद होतं त्यावर ठेवून बघितलं. त्या मगरीने काहीच केलं नाही.

"बघा आपण नक्कीच जाऊ शकतो. हिम्मत करा आणि माझ्या मागे या." चित्रा

चित्राने नंतर ह्या मगरीवरुन त्या मगरीवर उड्या मारुन नदी ओलांडली. तिच्या मागून तिच्या मैत्रिणीही उड्या मारत आल्या.

"घाबरलो तर पुढे कधीच जाऊ शकणार नाही." चित्रा

“हो राजकन्या. चांगलंच समजवलंत तुम्ही आम्हाला.” आनंदी बोलत असताना मागे वळून बघत होती. अजूनही तिला विश्वास बसत नव्हता आता जे घडलं त्यावर.

“बरं, जर तुमची थट्टा झाली असेल तर जायचं पुढे.” राधा

“निघूयात.” चित्रा

चालत असतानाच त्यांना लिंगाणा राज्याचा ध्वज दिसला. याचाच अर्थ ते आता त्या राक्षसाच्या खूप जवळ पोहोचले होते. पुढे गेल्यावर त्यांना एक भव्य आणि सुंदर महाल दिसला सोन्याचा.

“लिंगराजाचा महाल केवढा मोठा आहे ना? हे खरंच सोनं आहे का?” जवळ जायचा प्रयत्न श्रावणी करते पण तेवढ्यात तिला चित्रा थांबवते.

“अगं थांब, हात नको लावूस. हा लिंगराजाचा महाल नाहीये. त्यांचा महाल राज्याच्या मध्यभागी आहे. तो सोन्याचा नाहीये. हा त्या मायावी राक्षसाचा महाल असावा. आपल्याला महाराज राघवेन्द्रांनी सांगितले होते ना त्या राक्षसाचा महाल आहे सोन्याचा. हा तोच आहे. आत कसं जायचं पण?” चित्रा

“दरवाजा असेलच की या महालाला. चला शोधूयात नक्की सापडेल.” आनंदी. त्या सगळीकडे शोधाशोध सुरू करतात. शोधताना चित्रा एका ठिकाणी येऊन थांबते.

“हे बघा काय आहे इथे.” चित्रा

“सापडला दरवाजा?” राधा

“नाही पण ही जागा वेगळी वाटतीये. बाकाच्या भिंती साध्याच आहेत. या भिंतीवर नक्षी आहे. तुम्हाला विचित्र नाही वाटत?” चित्रा

“हो पण ह्याचा दरवाजाशी काय संबंध?” श्रावणी

“अगं वेडे कोणीही माझ्या घरात घुसू नये म्हणून सुरक्षिततेसाठी मी काय केलं असतं?” चित्रा

“काय मध्येच घर कुठून आलं?” श्रावणी

“मी पण कोणाला विचारतेय असो नीट ऐक. घराचा दरवाजा कुठे आहे हे कोणालाच माहीत नसतं तर?” चित्रा

“घरात कोणी शिरलंच नसतं.” श्रावणी

“अगदी बरोबर. आपण सगळीकडे बघितले पण काहीच संशयास्पद सापडलं नाही.” चित्रा

“ते सगळं ठीक आहे. पण घराला कुलुप असलंच पाहीजे. इथे तसं काहीच दिसत नाही.” आनंदी

“हे काय तुझ्या समोरच आहे की. नीट बघ.” चित्रा

“हो, ही नक्षी गोल आहे. आपण फिरवू शकतो. हेच आहे कुलुप पण

“चावीचं काय? आपण कसं हे चक्र फिरवलं तर दार उघडेल?” राधा

“जर आपण हे चक्र चुकीचं फिरवलं तर इथे काहीही होऊ शकतं. सगळं आपल्याला जपून करावं लागेल.” श्रावणी

“राजाने आपल्याला सांगितलं होतं की तो राक्षस कधीतरीच बाहेर निघतो. त्याचा सेवक नेहमी आत- बाहेर करत असतो. आपण त्याची वाट बघूया. त्याने दार उघडताच आपण त्यावर हल्ला करुन आत जाऊ.” आनंदी

“तोपर्यंत आपण इथेच वाट बघत बसायचं का? आणि समजा तो बाहेर असेल तरी पण तो येईपर्यंत आपण त्याची वाट नाही बघू शकत. खूप उशीर होईल.” चित्रा

“सेवक. हा सेवक. मिळाली आत जाण्याची चावी.” राधा

“राधा समजेल असे बोल. आधीच काही सुचत नाहीये. तु अजून गोंधळ वाढवू नकोस.” श्रावणी

“अगं आपल्याला लिंगराजाने सांगितले होते ना की राक्षसाचा सेवक काहीतरी बडबडत असायचा. काय होतं ते?” राधा

“सोपं आहे ते. उजवे तीन डावे दोन उजवा एक.” श्रावणी

“बाकीच्या गोष्टी कधी तुझ्या लक्षात राहत नाहीत ही कशी राहीली लक्षात?” आनंदी

“लक्षात ठेवणं एवढं पण अवघड नव्हतं. कारण त्यात फक्त उजवा डावा उजवा आणि तीन दोन एक होतं.” श्रावणी

“मिळालं उत्तर. हेच तर करायचं आहे आपल्याला. हे चक्र तीन वेळा उजवीकडे, दोन वेळा डावीकडे आणि एकदा उजवीकडे फिरवायचं आहे.” चित्रा

“थांब मी फिरवते.” राधा

जसं-जसं राधा ते चक्र फिरवत होती तसा त्यांना दरवाजा उघडण्याचा आवाज येतो.

“आता एकदा उजवीकडे फिरवलं की झालं. आता होईल जादू.” राधा

“उघडलं, दार उघडलं. चला आत जाऊ पटकन.” आनंदी

जेवढा महाल बाहेरुन सुंदर होता तेवढाच आतून पण सुंदर होता. तिथली प्रत्येक वस्तू सोन्याची होती. प्रवेश द्वारापासून सर्वत्रच लाल पायघड्या होत्या. सगळयांच्या डोळयांचे पारणे फिटले. सगळंच खूप भव्य होतं.

“हा महाल किती सुंदर आहे ना, कोणी म्हणेल का की इथे एक राक्षसाचं वास्तव्य आहे.” श्रावणी

“हो खरंच. मला तर इथेच राहावंसं वाटतंय.” आनंदी

“तुम्ही विसरताय आपण इथे का आलोय ते. महालाची सुंदरता नंतर बघा. आधी आपण जे काम करायला आलेय ते करुयात का महाराजांना आणि इतर लोकांना शोधायला हवे. आपण सिंहाच्या गुहेत आहोत ह्याचं भान ठेवा. राधा तु उजवीकडे जा. श्रावणी तु त्या दिशेला जा. आनंदी तु माझ्यासोबत चल. आपण त्या खोल्यांमध्ये बघू. लागा कामाला. जरा जपून. काही वेगळं वाटले तर लगेच बोलवा.” चित्रा

“हो.” आनंदी

सगळ्या सांगितलेल्या दिशेला जाऊ लागल्या. राक्षसाला त्यांच्या येण्याबद्दल आधीच समजले होते.

“मालक तुम्ही त्यांना आत का येऊ दिलं सुरुवातीलाच अडवायचं ना त्यांना जसं इतरांना अडवलत?” राक्षसाचा सेवक

“आतापर्यंत तर तेच करत आलोत ना काहीच मजा नाहीये त्यात. मला बघायचे होते त्या कुठेपर्यंत येतात ते. आपण इतरांना पण असंच कैद केले होते. पण ते सहज आपल्या जाळ्यात अडकले. आपल्या जादुई सैनिकांवर ते मात मिळवू शकले नाही.

पण ह्या मुलींनी सगळे अडथळे पार केले. मला ह्या खेळात खूप मजा येऊ लागली आहे. तु फक्त बघत रहा गंमत.” राक्षस

“काही सापडलं का तुला?” आनंदी

“काहीच नाही.” श्रावणी

“आता काय करायचे?” राधा

“आपण वर जाऊन शोधूयात. चला.” चित्रा

“आई गं!” श्रावणी

“जास्त लागलं तर नाही ना?” चित्रा

“नाही. चढायला गेल्यावर पायऱ्या कुठे गायब झाल्या?” राधा

“थांब मी त्या जिन्याने वर जायचा प्रयत्न करते.” आनंदी

“परत तसंच होतंय. आता काय करायचे?” श्रावणी

“तुम्ही दोघींनी एकत्र चढून बघा. राधा तु ह्या जिन्याने जा आणि श्रावणी तु पलिकडच्या जिन्याने जा.” चित्रा

“बरं, तसं करुन बघू.” राधा

दोघीही चढायला जातात आणि खाली पडतात.

“आता?” आनंदी

“जरा विचार करु.” श्रावणी

“आपण एक काम करु. तुम्ही दोघी जेव्हा चढाल तेव्हा एकत्रच पायरी चढा. मी सांगेन तेव्हा पायरी चढा.” चित्रा

“ठिक आहे.” आनंदी

“चढा.” चित्रा

दोघींनी एकत्रच तढायला सुरुवात केली आणि काहीच घडले नाही. यावेळी त्या यशस्वी होतात.

“तुम्ही पण या लवकर.” आनंदी

“आलोच.” चित्रा

“शोधूयात आता सगळ्यांना.” राधा

त्या सगळ्या खोल्या तपासायला सुरुवात करतात. एका खोलीत चित्राला एक सुंदर मूर्ती दिसते. ती मूर्ती बोलकी होती जणू. ती जशी मूर्तीच्या जवळ जाते तसा तिला श्रावणी- आनंदीची किंकाळी ऐकू येते. ती त्या आवाजाच्या दिशेने जाऊ लागते. समोर बघते तर राक्षसाने दोघींना पकडलेले असते.

“सोड माझ्या मैत्रिणींना.” चित्रा

“मला वाटलं नव्हतं तुम्ही इथपर्यंत याल. खरंच मानलं पाहिजे तुमच्या धाडसाला. मी तुम्हाला एक संधी देतो मला

मारण्याची. मारू शकलात तर तुमची सगळी माणसं माझ्या तावडीतून वाचतील पण जर मला मारू शकला नाहीत तर मी तुम्हाला आणि इथे कैद असलेल्या प्रत्येकाला मारून टाकीन. जास्त वेळ वाया घालवू नका.'' असे बोलून राक्षस जोरजोरात हसू लागतो.

त्याचं बोलणं होताच चित्रा त्याच्यावर हल्ला करते. तिला बघून राधा, श्रावणी आणि आनंदीही त्याच्यावर वार करु लागतात. त्यांच्या हल्ल्याचा राक्षसावर काहीच परिणाम होत नाही. सतत करत असलेल्या वारांने चित्रा आणि तिच्या मैत्रिणी थकून जातात.

‘‘काय झालं? दमलात इतक्यात? तुम्ही मला मारायला आला होतात ना? तुम्हाला तुमच्या माणसांना वाचवायचे होते ना? असेच वार करत राहिलात तर मलाच काय माझ्या सावलीला सुद्धा मारु शकणार नाही तुम्ही. खरंच खूप दया येतेय तुमच्यावर.'' राक्षस पुन्हा एकदा गडगडाटी हसला.

राक्षसाने सावली बोलताच चित्राला ती बोलकी मूर्ती आठवली आणि वडीलांनी सांगितलेली गोष्ट पण की प्रत्येकाचा जीव हा कशात ना कशात तरी अडकलेला असतोच. आई-वडीलांचा त्यांच्या पाल्यात, लोभी माणसांचा पैशात तसाच या राक्षसाचा जीव त्या मूर्तीत असला तर लगेच ती धावत मूर्ती

असलेल्या खोलीत गेली. जशी ती त्या मूर्तीजवळ जाऊ लागली तशा तिला तिच्या मैत्रिणींच्या किंकाळ्या ऐकू येऊ लागल्या.

"राजकन्या वाचवा, वाचवा आम्हाला!" श्रावणी

पुढचा- मागचा काहीही विचार न करता राजकन्येने ती मूर्ती फोडून टाकली.

"आता बघू कोण जीवंत राहतंय तु की मी?" चित्रा. आणि तिला आणखी एक किंकाळी ऐकू आली त्या राक्षसाची. तिचा आणि तिच्या मैत्रिणींचा विजय झाला होता. ती धावत त्यांच्याकडे गेली.

"तुम्ही सगळ्या ठीक आहात ना?" चित्राने काळजीने विचारले.

"हो. तुम्ही वेळेत वाचवले. तो आम्हाला मारणारच होता पण अचानक काय झाले त्याला माहीत नाही. त्याने एक किंकाळी फोडली आणि तो अचानक खाली पडला. त्याला पडलेले पाहून त्याचा नोकर जे समजायचे ते समजून फरार झाला." राधा

"आपण यशस्वी झालो आहोत. पण तुम्ही नक्की केलेत काय?" श्रावणी

"ते मी इथून बाहेर पडल्यावर सांगते. आपण अजून यशस्वी झालो नाहीत. आपली अर्धी मोहीम अजून बाकी आहे. अजून

आपल्याला कैदींना आणि महाराजांना सोडवायचे आहे. चला लवकर. या महलात जास्त वेळ थांबणे धोक्याचे आहे.” चित्रा

त्यांनी सगळीकडे शोधाशोध सुरू केली. एका खोलीतून आवाज येत होते. त्या दिशेला सगळया गेल्या. ती खोली नसून एक प्रकारचे कारागृहच होते. महाराज आणि इतर कैदी तिथेच होते.

“पिताश्री आम्ही आलो आहोत तुम्हाला सोडवायला. काळजी करु नका.” चित्रा

“दाराला तर कुलुप आहे. चावी कुठे सापडणार?” श्रावणी

“ही बघ चावी.” आनंदी

त्यांना सोडवून बाहेर काढणार इतक्यात महालाच्या भींती ढासळू लागल्या.

“आपल्याला इथून लवकर बाहेर पडले पाहिजे.” राधा

“या दिशेने चला.” चित्रा

सगळे सुखरुप बाहेर पडले. तोवर लिंगराजही तिथे पोहचला होता.

“लांबून मला हा महाल कोसळताना दिसला. याचाच अर्थ आपली राक्षसाच्या तावडीतून राजकन्येने सुटका केली. या संकटातून वाचवल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे!” लिंगराजाने स्मित करत आभार मानले.

“आभार मानायचेच असतील तर आमच्या कन्येचे आणि तिच्या मैत्रिणींचे माना.

त्यांच्यामुळेच आज आम्ही आहोत. खरंच मुली काही पण करू शकतात हे त्यांनी दाखवून दिलंय. फक्त त्यांना कोणत्याही बंधनात अडकवलं पाहिजे. मुलांच्या खांद्याला खांदा लावून त्या ही घराचे नाव उजळू शकतात, कोणत्याही आव्हानाला सामोरे जाऊ शकतात. मला अभिमान आहे तुमचा!” महाराज चक्रधर म्हणाले.

“हे तर आमचे कर्तव्य होतं.” चित्रा

“मी तुम्हाला तुमच्या राज्यात सोडायची व्यवस्था करतो. तिथे ही सगळे चिंतेत असतील. जखमी असलेल्यांचा आधी उपचार करु. तोवर तुम्ही आराम करा.” लिंगराज म्हणाले.

सगळं पूर्ववत झाले होते. नदीवरचा पूलही परत आला होता. नदीतल्या मगरीही गायब झाल्या. सगळीकडेच आनंदाचं वातावरण होतं. कामाक्षीपुरमच नव्हे तर इतर राज्यांतही ही वार्ता पोहचताच सगळ्यांनी जल्लोष केला. कामाक्षीपुरम मध्ये पुन्हा एकदा सुख, समृद्धीची नांदी सुरु झाली.

# स्कॉलर

हुशारी अनेक लोकांना बोचते. जो हुशार असतो त्यांना स्वतःला ही ती बोचू शकते. आशुतोष दरवर्षी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हायचा. त्याने नुकतंच बी.ए ला प्रवेश घेतला होता. कॉलेज सुरु होताच शिक्षकांना आणि त्याच्या वर्गमित्रांना त्याच्या हुशारीची आणि ज्ञानाची प्रचिती आली. प्रत्येक तासाला योग्य उत्तरे देणं, शिक्षकांना डाऊट विचारणे यामुळे मुलांना वाटू लागले की तो खूपच हुशार आहे. ह्याच्याशी मैत्री केलीच पाहीजे. लवकरच तो शिक्षकांचा आणि विद्यार्थ्यांचा लाडका झाला. मुलींमध्येही त्याचीच चर्चा असायची. त्याला कारण पण तसंच होतं.दिसायला एकदम राजबिंडा, शांत आणि हुशार असं त्याचं व्यक्तिमत्त्व होतं. सगळयांना मदत करण्याची त्याची वृत्ती होती. अभ्यासात इतरांना मदत करणे, नोट्स देणे, इ. त्याला फार आवडत. त्याला इतरांमध्ये मिसळायला जास्त वेळ लागला नाही. सर्वांपैकी त्याची नंदिनी, राघव, सुलभा आणि अश्विन यांच्याशी चांगली गट्टी जमली.

नंदिनी आशुतोष सारखीच हुशार आणि समंजस होती. दिसायला ही सुंदर होती. वर्गातील अनेक मुलांचं हृदय तिने घायाळ केलं होतं. अनेकांनी तिला विचारले ही होते पण इतक्यात मला ह्या गोष्टींमध्ये पडायचे नाही असे ती ठणकावून सांगे. अभ्यास एके अभ्यास असेच तिला वाटायचे.

राघव त्यांच्या ग्रुपमध्ये सगळ्यात जास्त डॅशिंग होता. प्रत्येक क्षण जगायचा असतो मित्रा असे तो नेहमी म्हणायचा. अभ्यासात जास्त रस नव्हता त्याचा. लेक्चर बंक मारणे, टवाळक्या करणे हे त्याचे छंद होते. क्लासरुममध्ये कमी आणि कँन्टीनमध्ये आणि कट्ट्यावर तो जास्त दिसे.

सुलभा कमी बोलणारी आणि खूप लाजाळू होती. इतरांशी बोलताना ती खूप घाबरायची पण जर तिने एकदा मैत्री केली की ती खूप मोकळेपणाने वागायची. सर्वांसोबत ती खूप मस्ती करायची आणि गप्पा मारायची.

अश्विन एकदम बिंधास्त व्यक्तिमत्त्व. ये जिंदगी ना मिलेगी दोबारा नेहमी म्हणायचा. असे हे सगळे स्वभावाने जरी एकदम वेगळे असले तरी मैत्रीच्या बंधाने मात्र एकत्र आले होते.

कॉलेज म्हणलं की धमाल, मस्ती, नवीन मित्र, डेज, नवीन अनुभव, प्रेम, कट्टा, इ. आलेच. सगळे म्हणतात आयुष्याचा खरा

अर्थ हा कॉलेज लाईफमध्येच कळतो. अनेक चांगल्या-वाईट गोष्टी कॉलेजमध्येच कळतात. घडणं-बिघडणं ही तिथेच. अनेकांना जर विचारले,

“तुमच्या आयुष्यातला आवडीचा काळ कोणता?”

“कॉलेज ते पण काय दिवस होते!”

असं उत्तर हे ठरलेलंच. शाळेतल्या आठवणी ही खूप सुंदर असतात. आयुष्य काय असतं हे मात्र आपल्याला कॉलेजमध्यंच गवसतं.

छान ओळखी झाल्या. नवीन मित्र- मैत्रिणी मिळाल्या. फ्रेशर्स पार्टीही झाली. कॉलेज लाईफ एनजॉय करायला सुरुवात झालीच होती की लगेच पहिल्या सेमिस्टरचं वारं जोमाने वाहू लागलं.

कँन्टीनमध्ये-

“परीक्षेची तयारी सुरु केलीस का?” नंदिनी

“नाही ना यार” अश्विन

“अरे काय चाललंय? तुमचं मस्त माहोल आहे. समोर चहा आणि वडापाव आहे त्याचा आस्वाद घ्यायचा सोडून हे परीक्षेचं काय घेऊन बसलाय?” राघव

“तुला नाही येत का टेन्शन?” सुलभा

“टेन्शन आणि मला? नो चान्स! वन नाईट स्टडी खूप झाला पासींगसाठी. जास्त टेन्शन नको घेऊस तसंही परीक्षेला अजून खूप वेळ आहे ना” राघव

“काय रे आशु तुझा झाला असेल ना रे अभ्यास? आम्हाला प्लिज मदत कर हा परीक्षेला आणि नोट्स काढल्या असतील तर त्या पण दे!” सुलभा काकुळतीला येऊन विचारू लागली.

“नाही गं अजून सुरु नाही केला अभ्यास. डॉन्ट वरी मी करेन तुम्हाला मदत. नोट्सही देईन. आणि हो टेन्शन घेतल्याने पेपर सोपे जात नाहीत. जस्ट चिल!” आशु उर्फ आशुतोष

“तुझं काय बाबा तुम्ही स्कॉलर लोकं तुझा अभ्यास पण सुरु झाला असेल. आम्ही घरी थोडी ना येतो तुझ्या बघायला तु अभ्यास करतो की नाही ते?” नंदिनी

“खरंच सांगतोय काहीच नाही केलाय.” आशु

“अरे यार तुम्ही तर सुरुच झालात.” अश्विन

“फक्त चर्चा तर करतोय.एवढं काय त्यात?” सुलभा

“आता जरा खाऊन पण घ्या चहा गार होतोय.” नंदिनी

हळू-हळू तोंडी परिक्षा झाल्या. पेपर उद्यावर येउन ठेपले.

पुढचा दिवस सगळे लवकर येऊन थांबलेत.

“हाय आशुतोष! झाला अभ्यास?” शशांक

“हाय. झालाय बऱ्यापैकी. आता बघू परीक्षा कशी जाते ते.” आशु

“तुला चांगलीच जाईल मला खात्री आहे याची. जरा ऐक ना!” शशांक

“बोल आशु

“प्लिज मला मदत कर पासींग पूरती तरी. अभ्यास करून आलोय पण तरी मदत कर. तुझा नंबर माझ्यानंतरच आहे ना?” शशांक

“हो, तुझ्यानंतरच आहे. मी करेन मदत. डोन्ट वरी.” आशु

“काय रे शशांक? पेपर फिक्सींग करतोयस का माझ्या मित्रासोबत?” राघव

“नाही रे, तसं काहीच नाहीये.” शशांक

“मला समजतं सगळं. आशु तु इथेच थांबणार आहेस का? आणि अजून गप्पा मारायच्या असतील तर थांब. तु इथे दिसलास म्हणून आलो. चल ना आत, सगळे आत वाट बघत असतील. मी तर चाललो.” राघव

“हो, जाऊ या.” आशु

“आशुतोष, मी सांगितलेलं लक्षात ठेव हा प्लिज!” शशांक

“आहे लक्षात माझ्या. काळजी नको करूस!” आशु

“तु त्याला पेपर दाखवणार आहेस?” राघव

“हो! पण पासींग पूरतीच करणार आहे.” आशु

“तु पण ना मदत कर पण स्वतःचा ही पेपर आहे हे मात्र विसरु नकोस.” राघव

“हो रे बाबा. अजून काही उपदेश?” आशु

“नाही. सध्या तरी एवढंच. काही आठवलं तर नंतर सांगेन.” राघव

“आशु, राघव किती वेळ लावलात तुम्ही! आम्ही केव्हापासून वाट बघतोय” सुलभा

“सो सॉरी यार! सिटींग अरेंजमेंटची लिस्ट लागली का?” आशु

“हो लागलीये. जा पटकन बघून या.” नंदिनी

“त्याची काही गरज नाहीये. मी आलोय बघून.” अश्विन

“दोघांचा बघितलास ना?” राघव

“हो. आशु तुझा पाच नंबर खोलीत आहे आणि राघव तुझा चार मध्ये लागलाय.” अश्विन

“वा चार माझा लकी नंबर आहे. नक्कीच मला पेपर सोपे जाणार.” राघव

“लकचं मला काही माहित नाही, अभ्यास तर केलायस ना?” अश्विन

“परीक्षेचं टेन्शन मी घेत नाही हे माहीतेय ना तुला. पास झालं बास झालं. तेवढा तर नक्कीच अभ्यास करुन आलोय.” राघव

“राघव, माझा आणि अश्विनचा एकाच वर्गात लागलाय नंबर. आशुचा नंबर लागायला हवा होता आमच्यासोबत तेवढीच मदत झाली असती त्याची.” सुलभा

“सगळे आय.एम.पी करुन आली आहेस ना तु?” नंदिनी

“हो केलेत. काय माहीत आता पेपर कसा जातो ऑल द बेस्ट सगळ्यांना. चांगला लिहा पेपर.” सुलभा

“हो, तुला पण!” आशु

इतक्यात पहिली बेल वाजली. सगळे पुन्हा एकदा एकमेकांना ऑल द बेस्ट म्हणाले आणि आपआपल्या वर्गात गेले. शशांकचा नंबर आशुच्या मागेच होता. त्याने पुन्हा एकदा आशुला त्यांच्या बोलण्याची आठवण करुन दिली. दुसरी बेल वाजताच पेपर सुरु झाला. पेपर संपताच सगळे बाहेर आले.

“ए आशु ह्या प्रश्नाचं उत्तर काय होतं? मी हे लिहीलंय!” सुलभा

“बरोबर आहे. पेपर कसा गेला तुम्हाला? मला तर चांगला गेला.” आशु

“मला बरा गेला.” अश्विन

“राघव तुझा कसा गेला पेपर?” सुलभा

“पासींग पूरतं लिहून आलोय. अश्विनने ही थोडी मदत केली.” राघव

“उद्यासाठी बेस्ट ऑफ लक सगळ्यांना चला मी निघते. घरी लवकर जायचंय. उद्याचा खूप अभ्यास करायचाय. आता मी पळते. बाय!” सुलभा

“थांब ना थोडा वेळ मग जा. आपण काहीतरी खाऊ. आज खूप डोकं चालवलंय त्यामुळे भूक लागलीये. चला कॅन्टीनमध्ये.” राघव

“नको. कॅन्टीनमध्ये गेलो तर खूप उशीर होईल घरी जायला. मी निघते.” सुलभा

“अगं थांब तरी. ए सुलभा. सुलभा.... गेली पण ही. खूप टेन्शन घेतलेलं दिसतंय हिने.” अश्विन

“आपण तरी जाऊ कँन्टीनमध्ये. मला ही खूप भूक लागलीये.” नंदिनी

“थँक्स आशुतोष! तु जर आज मदत केली नसतीस तर फेलच झालो असतो. बाय अँन्ड थँक्स अगेन!” शशांक

“बाय!” आशु

“पूर्ण वेळ तर हा बसूनच होता. सतत दुसऱ्यांना उत्तरं विचारत होता. अभ्यास काहीच केला नाही ह्याने. आशु तु उद्या ह्याला जास्त मदत करु नकोस.” नंदिनी

“आशु अरे बोल की काहीतरी. ती तुझ्याशी बोलतेय. कुठे हरवला तु?” अश्विन

“काय झालंय तुला?” राघव

“खरंतर मला पण उद्याचं टेन्शन आलंय. उद्याचा पेपर खूप अवघड आहे. मी पास होईल की नाही हा प्रश्न सतत डोक्यात भुणभुणत आहे.” आशु

“अरे तु स्कॉलर आहेस. काहीही बोलू नकोस. तुझा तर अभ्यास पण झाला असेल. प्रँक करतोयस का?” अश्विन

“गंमत करत नाहीये. खरं होलतोय मी.” आशु

“कम ऑन यार. बास झालं तुझं. प्रँकच करतोय तु. तुझा अभ्यास होणार नाही हे शक्यच नाहीये.” नंदिनी

“मी स्कॉलर जरी असलो तरी मला ही परीक्षेचं टेन्शन येऊच शकतं ना “मी ही तुमच्यासारखा एक विद्यार्थी आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला परीक्षेचं टेन्शन हे असतंच. ते त्या विद्यार्थ्यावर असतं की तो ती कसं सांभाळतो ते मला ही वाटू शकतं ना की मी पास होईल की नाही. प्लिज तुम्ही मला सतत गृहीत धरू नका!” आशु

“सॉरी आशु! मला तसं म्हणायचं नव्हतं. अरे पण तुच बघ ना किती हुशार आहेस बारावीला तुला किती छान गुण मिळालेत. मग कोणालाही हेच वाटेल की तुला सगळेच पेपर सोपे जात असतील. म्हणून मी तसं बोलले.” नंदिनी

“तेच तर मी म्हणतोय नंदिनी. तुम्ही सगळे मला गृहीत धरताय. काल आई पण सारखी म्हणत होती,”अभ्यास झाला का? पहिला क्रमांक हुकता कामा नये. वेळ वाया घालवू नकोस, अभ्यास कर.” मलाही माहीत आहे त्यांना माझ्या भविष्याची काळजी आहे. पण सतत तेच का तुम्ही, माझे आई-बाबा, माझे नातेवाईक, शेजारी-पाजारी, शिक्षक, सगळे मला सतत आठवण करुन देत असता की मी हुशार आहे. ह्यामुळे मला खूप प्रेशर येतं की जर मी चांगले गुण नाही मिळवू शकलो तर? जर मी फेल झालो

तर? सतत एक दडपण असल्यासारखं वाटतं यार. अनेकांच्या खूप अपेक्षा आहेत माझ्याकडून. जर त्या मी पूर्ण करू शकलो नाही तर आयुष्यभर मला ते बोचत राहणार. माझं म्हणणं एवढंच आहे की प्रत्येक विद्यार्थ्याची हुशारी वेगळी असते. जर कोणी जास्त हुशार असेल तर सतत त्याला त्याची जाणीव का करुन द्यावी त्याला ही माहीतेय तो हुशार आहे. सतत बोलून 'तु हुशार आहेस', 'चांगले गुण मिळवशील नक्कीच', 'आमच्यासारख्या विद्यार्थ्यांना असतं टेन्शन, तुला नाही यायचं', 'तु स्कॉलर आहेस, पेपर सोपे जातील'. असं फक्त बोलत जाऊ नका. प्लिज, मी जर काही चुकीचं बोललो असेल तर सॉरी. मी बोललोय त्याचा नक्की विचार करा. येतो मी."